अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या
मान्यतेनुसार राज्यातील खाजगी
औषधनिर्माणशास्त्र संस्थेस शासनाची
मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. सीटीसी-२००९/(१९५/०९)/तांशि-४,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २५ ऑगस्ट, २००९.

संदर्भ :- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र. ०८/०१/MHA PHARM/२००८/६४, दिनांक ३० जून, २००९ चे पत्र
२) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३१४/२००९ वर दिनांक १३ ऑगस्ट, २००९ रोजी दिलेले आदेश.

**शासन निर्णयः-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन दिनांक ३० जून, २००९ च्या पत्रान्वये खाली नमूद केलेल्या संस्थेस नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. सदरहू आदेश दिनांक १५ जून २००९ नंतरचे असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक २२८७/२००७ या प्रकरणी दिलेल्या आदेशानुसार सदरहू संस्थेस शैक्षणिक वर्ष २००९-१० करिता शासनाची मान्यता देण्यात आली नव्हती. ही बाब लक्षात घेऊन सदरहू संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ३१४/२००९ दाखल केली. या याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑगस्ट, २००९ रोजी सदरहू संस्था शैक्षणिक वर्ष २००९-१० करिता संबंधित विद्यापीठ व राज्य शासन यांची मान्यता तसेच आवश्यक त्या अटी व शर्तींची पूर्तता करुन प्रवेश प्रक्रिया राबवू शकते असे आदेश पारित केले आहेत. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | श्री तुळजा भवानी सेवाभावी शैक्षणिक व सामाजिक शिक्षण संस्थेचे हाय-टेक कॉलेज ऑफ फार्मसी, सर्व नं. १४८/१, १४८/४, नागपूर हायवे मोरवा, चंद्रपूर ४४० ४०१ | बी फार्मसी | ६० |
| | | एकूण | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थाना खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यास करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

सचिव
तुळजाभवानी सेवा भावी शैक्षणिक व सामाजिक शिक्षण संस्था
कोठारी जि चंद्रपूर

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

९) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
संबंधित संस्था (संचालकां मार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती / तांशि-४

सचिव
श्री तुळजाभवानी सेवा भावी शैक्षणिक व [illegible] शिक्षण संस्था,
कोठारी जि चंद्रपूर